माहितीचा अधिकार

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत
(CIN No.U40109MH2005SGC153646)
४०० केव्ही ग्रहन केंद्र विभाग, कोराडी-१

प्रेषक :– कार्यकारी अभियंता
४०० केव्ही ग्रहन केंद्र विभाग,कोराडी-१
१३२ केव्ही मानकापुर परिसर, कोराडी रोड
नागपुर-४४००३०
दूरध्वनीक /कार्यालय (०७१२) २५९४४४५
Email ID-ee4130@mahatransco.in

काअ/४०० केव्ही/ग्रहण केन्द्र/विभाग/नाग/मांस/524 दिनांक 05/09/2024

## शिकाऊ उमेदवार कायदा १९६१, अंर्तगत सत्र २०२४-२५ करीता प्रतिक्षा यादीतुन निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री व्यवसायात उत्तीर्ण पात्र उमेदवारांकडुन अउदा संवसु प्रविभाग, नागपुर अंर्तगत ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र विभाग,कोराडी करीता एकुण १३ जागां करीता शिकाऊ उमेदवारी एक वर्ष कालावधी करीता ऑनलाईन अर्ज तथा ऑफलाईन अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतीम दि. २७.०६.२०२४ तसेच स्वहस्ते/पोस्टाने अर्ज सादर करण्याची अंतीम दि. १६.०७.२०२४ होती.

२. वैध अर्ज असलेल्या पात्र उमेदवारांची त्यांच्या एस.एस.सी. तसेच आय.टी.आय (विजतंत्री) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे. उमेदवारांच्या अर्जा मध्ये असलेल्या माहिति नुसार प्रवर्ग निहाय सामाजिक आरक्षणाच्या आधारे गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांची एकत्रित गुणांची टक्केवारी समान आहे. अशा उमेदवारांची जन्म तारीख विचारात घेवुन वयाच्या ज्येष्ठतेनुसार क्रमवारी लावण्यात आली.

४. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारी करीता उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पुरती निवड यादी ही उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जातप्रवर्ग, व ईतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे जर उमेदवार शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होण्यासाठी ची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्ती चा भंग होत असल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

पात्रते संबंधी गुणपत्रिका/प्रमाणपत्रे,सामाजिक आरक्षणा करीता ज्या प्रवर्गातुन अर्ज सादर

केलेला आहे त्याप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, ज्या प्रवर्गाकरीता प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र) आवश्यक आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र), आर्थिक दुर्बल घटक ( EWS ) प्रवर्गातील उमेदवारांना ई.डब्लु.एस. प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, ईत्यादी मुळ प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. जर उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या वेळेस वरिल पैकी मुळ प्रमाणपत्र दर्शविण्यात असमर्थ ठरल्यास किंवा मुळ प्रमाणपत्र व अर्जा सहजोडलेल्या प्रमाणपत्रां मध्ये तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांपैकी कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने, कागदपत्र पडताळणी करीता विहीत मुदतीत हजर न झाल्याने, अथवा कागदपत्र पडताळणीत पात्र ठरूनही दिलेल्या ठिकाणी विहीत मुदतीत रूजु न झाल्याने रिक्त असलेल्या जागांकरीता गुणवत्ता यादीतील कमवारी ने प्रतिक्षा यादी आपोआपच कार्यान्वित होऊन खुल्या तथा राखीव जागां करीता प्रवर्ग निहाय उमेदवारांची निवड तथा प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र, विभाग, कोराडी राखुन ठेवत आहे.

७. तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करतांना सर्वप्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापी, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र, विभाग, कोराडी राखुन ठेवत आहे.

८. निवड न झालेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे फोन, ईमेल किंवा पत्रव्यहार ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र, विभाग, कोराडी कार्यालयाकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही ईमेल किंवा पत्र व्यवहाराची या कार्यालया कडुन दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. तात्पुरती निवड यादीतुन निवड झालेल्या उमेदवारांनी दि.०५.०९.२०२४ पासुन०९.०९.२०२४ पर्यंत "कार्यकारी अभियंता," ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र विभाग, कोराडी, १३२ के.व्ही.मानकापुर परीसर, मानकापुर नागपुर, या पत्त्यावर कार्यालयीन दिवशी ( शनिवार/रविवार वगळुन ) कार्यालयीन वेळेत सकाळी १०:०० ते ६:१५ मुददा क.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुळ प्रमाणपत्रे (१ संच साक्षांकित झेरॉक्स प्रतीसह) पडताळणीकरीता हजर राहावे. दि. ०९.०९.२०२४ नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा–या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

१०. कागदपत्र पडताळणी करीता येणा–या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा ईतर खर्च दिल्या जाणार नाही, सर्व उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहावे लागेल.
कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र विभाग, कोराडी या विभागात तात्पुरती निवड झालेल्या उमेदवाराचीं तात्पुरती निवड यादी खालील प्रमाणे

## Revised Provisional Waiting List

**Proforma-B**

**Open Category**

| Sr.No. | Application Code | Candidate Name | Aggregate % | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | AP0624114735 | Kunal Dilip Kadamdhad | 65.52 | |

(एस.आर.जारोंडे)
कार्यकारी अभियंता
४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग, कोराडी-१